जेथे एकता तेथे सुरक्षितता,संघटनकला संघटन कलयुगे – श्री समर्थ

# महाराष्ट्र राज्य तलाठी पटवारी मंडळ अधिकारी समन्वय महासंघ


**बाळकृष्ण गाढवे**
**सरचिटणीस**
स्वामी समर्थ नगर, दारव्हा
ता.दारव्हा जि.यवतमाळ
मोबा.८८०५९८०३३३

**श्याम जोशी**
**अध्यक्ष**
इरिगेशन कॉलनी,सिव्हील लाईन,
वाशिम जि.वाशिम
मोबा ९४२०३९१२५५/९४२२९६०२१८

**समन्वय महासंघाचे कार्यालय – द्वारा : जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम ता. जि. वाशिम**

**श्री.ज्ञानदेव आनंदराव डुबल, अध्यक्ष,**महाराष्ट्र राज्य तलाठी संघ, मु.पो.सैदापूर ता. कराड जि.सातारा मो.९८५०९६४१७४

**श्री.लक्ष्मीकांत काजे, सरचिटणीस,**महाराष्ट्र राज्य तलाठी संघ,मु.पो.रामकृष्ण नगर,वसमत रोड,परभणी

**श्री.बाळकृष्ण गाढवे,अध्यक्ष,** विदर्भ पटवारी संघ,नागपूर स्वामी समर्थ नगर,दारव्हा,जि. यवतमाळ

**श्री.संजय पांडूरंगजी अनव्हाने,सरचिटणीस,**विदर्भ पटवारी संघ,बी-०३,बिदीशा अपार्टमेंट,शिवाजी कॉम्प्लेक्स,न्यू मानकापूर,नागपूर मो.९८६०९९१४५४

**श्री.डी.के.काटकर,अध्यक्ष,** विदर्भ मंडळ अधिकारी संघ,नागपूर रा.मातोश्री निवास, सिव्हील लाईन, सर्किट हाऊस जवळ, वाशिम मो. ९४२२८१००६७

**श्री.शे.बा.चव्हाण, सरचिटणीस,**विदर्भ मंडळ अधिकारी संघ,नागपूर रा.सुभेदार एक्सटेंशन,नागपूर प्लॉट नं.२३९ फोन नं.:०७१२-२७४२७६६

**श्री दिलीप देसाई,अध्यक्ष,** रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हा तलाठी संघ, रा.बी-2, वेदांत पाराडाईज,थिबा पलेस रोड, रत्नागिरी, जि.रत्नागिरी मो.८५५२८९९९९

**श्री.उमाकांत देशमुख, सरचिटणीस,**रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हा तलाठी संघ, बी-८/१०२,सिद्धिविनायकनगर,शिवाजी नगर, रत्नागिरी, जि. रत्नागिरी मो.९०४९१८४९४१

**विभाग निहाय सदस्यः**
टी.जी.सावंत (कोकण)
रवी कुलकर्णी (औरंगाबाद)
अनिल ठोंबरे (औरंगाबाद)
जी.डी.महाले (नाशिक)
व्ही.डी. टेकाळे (अमरावती)
राजेश चुटे (नागपूर)
सी.झेड. बोरकर (नागपूर)


**जा.क्र :१०/२०२०** **दिनांकः- 04/06/2020**

**प्रती,**
मा.अप्पर मुख्यसचिव
महसूल
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई

विषयः- महसूल मंडळ दैनंदिन पर्जन्यमानाची आकडेवारी संकलित करणे संदर्भात.....
महसूल मंडळअधिकारी संवर्गास अकारण सक्ती करणेबाबत......

संदर्भः- १)महसूल व वन विभाग,महा. शासन यांचेपत्र क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र.१३४/म-७ दि १२ जून २०१९.
२)आपलेकार्यालयीन पत्र जा.क्र./सा-७/पर्जन्यमान/९१/२०१९ दि.१९.०६.२०१९
**३)** महासंघाने आपणास दिलेले निवेदन क्र.०५/२०२० दि. १२.०५.२०२०

मा.महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून नम्र निवेदन सादर करण्यात येते की, संदर्भ क्र. १ मध्ये उक्त विषयाचे संदर्भात मा. सचिव (कृषि) यांचे अध्यक्षतेखाली दि. ९ एप्रिल २०१९ रोजीच्य सभेमधील निर्णयानुसार**, खरिप हंगाम २०१९ हंगामा पासून मंडल निहाय पर्जन्यमानाची नोंद ही महावेध प्रकल्पाअंतर्गत गठीत स्वयंचलित हवामान केंदाद्वारे उपलब्ध होणाऱ्या आकडेवारी वरून संकलित करण्यात यावी,** असे स्पष्ट निर्देश असल्याचे नमूद केले आहे.

संदर्भ क्र. २ नुसार आपण आपले कार्यालयीन पत्राद्वारे राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना या बाबत अवगत करण्यात आले आहे. उक्त पत्राचे परिच्छेद क्र. ३ मध्ये,.......... **त्या अनुषंगाने, पर्जन्यमानाचे आकडेवारी साठी महारेण व महावेध या दोन स्वतंत्र प्रणाली कार्यान्वित ठेवण्याऐवजी महावेध प्रणालीमधील पर्जन्यविषयक आकडेवारीच विचारात घेणेबाबत उपरोक्त संदर्भीय क्र ३ अन्वये शासनाने निर्देश दिले आहेत,** असे स्पष्ट नमूद केलेआहे.

याच पत्रामध्ये सर्व जिल्हाधिकारी यांना महावेध पोर्टलचा लोगइन आय डी/ पासवर्ड देण्यात आल्याचे नमूद असून , **महारेन पोर्टलवर यापुढे महावेध प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध आकडेवारीच प्रसिद्ध करण्यात येईल.** असे स्पष्ट करण्यात आले आहे.

आपणास **संदर्भ क्र. ३** चे माध्यमातून नम्र निवेदन करण्यात आले की सुमारे बारा वर्षापुर्वी सुरु करण्यात आलेल्या पर्जन्यमान मोजण्याच्या या पद्धतीने ,
१)राज्यातील महसूल मंडळअधिकारी यांनी विनामोबदला चोखपणे कर्तव्य बजावले आहे.
२)पर्जन्यमान मोजण्याकरिता वापरातअसलेली साधन सामग्रीआजरोजी कालबाह्य/नादुरुस्त झाली आहे.
३)त्या ऐवजी शासनाने स्वयंचलित हवामान केंद्रे स्थापन केलीआहेत.

या सर्व बाबी विचारात घेऊन, महसूल मंडळ स्तरावरून, मंडळअधिकारी यांचे माध्यमातून माहिती संकलित करण्याची आवश्यकता नसल्याबाबतचे स्पष्ट निर्देस संबंधितास देण्यात यावेत, अशी नम्र विनंती महासंघाने **संदर्भ क्र. ३** नुसार केली आहे.

असे असतांना राज्यातील सर्व महसूल आयुक्तालये व जिल्हाधिकारी कार्यालये यांचे स्तरावरून, महसूल मंडळ स्तरावर बसविण्यात आलेल्या पर्जन्यमापक यंत्राच्या आधारे संकलित करण्यात येणाऱ्या आकडेवारीचा आग्रह धरण्यात येतो. आज रोजी राज्यातील महसूल आयुक्तालये व जिल्हाधिकारी कार्यालये उक्त निर्देशांबाबत अनभिज्ञ असल्याचे जाणवत आहे.

**महा.शासनाचे पत्र संदर्भ क्र. १ च्या आधारे मा. आयुक्त कृषी पुणे यांनी संदर्भ क्र. २ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांनी त्यांचे स्तरावरून वेळीच योग्य निर्णय घेऊन कार्यवाही न केल्या मुळे आजची परिस्थिती निर्माण झाली आहे,**

(पुढे पान २ वर)

जेथे एकता तेथे सुरक्षितता,संघटनकला संघटन कलयुगे – श्री समर्थ

# महाराष्ट्र राज्य तलाठी पटवारी मंडळ अधिकारी समन्वय महासंघ

**बाळकृष्ण गाढवे**
**सरचिटणीस**
स्वामी समर्थ नगर, दारव्हा
ता.दारव्हा जि.यवतमाळ
मोबा.८८०५९८०३३३

**श्याम जोशी**
**अध्यक्ष**
इरिगेशन कॉलनी,सिव्हील लाईन,
वाशिम जि.वाशिम
मोबा ९४२०३९१२५५/९४२२९६०२१८

**समन्वय महासंघाचे कार्यालय – द्वारा : जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम ता. जि. वाशिम**

**श्री.ज्ञानदेव आनंदराव डुबल, अध्यक्ष,**महाराष्ट्र राज्य तलाठी संघ, मु.पो.सैदापूर ता. कराड जि.सातारा मो.९८५०९६४१७४
**श्री.लक्ष्मीकांत काजे, सरचिटणीस,**महाराष्ट्र राज्य तलाठी संघ,मु.पो.रामकृष्ण नगर, वसमत रोड, परभणी
**श्री.बाळकृष्ण गाढवे,अध्यक्ष,** विदर्भ पटवारी संघ, नागपूर स्वामी समर्थ नगर, दारव्हा,जि.यवतमाळ
**श्री.संजय पांडूरंगजी अनव्हाने,सरचिटणीस,**विदर्भ पटवारी संघ,बी-०३,बिदीशा अपार्टमेंट, शिवाजी कॉम्प्लेक्स,न्यू मानकापूर,नागपूर मो.९८६०९९१४५४
**श्री.डी.के.काटकर,अध्यक्ष,**विदर्भ मंडळ अधिकारी संघ,नागपूर रा.मातोश्री निवास, सिव्हील लाईन, सर्किट हाऊस जवळ, वाशिम मो. ९४२२८१००६७
**श्री.शे.बा.चव्हाण, सरचिटणीस,**विदर्भ मंडळ अधिकारी संघ,नागपूर रा.सुभेदार एक्सटेंशन,नागपूर प्लॉट नं.२३९ फोन नं.:०७१२-२७४२७६६
**श्री दिलीप देसाई,अध्यक्ष,** रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हा तलाठी संघ, रा.बी-2, वेदांत पाराडाईज,थिबा पलेस रोड, रत्नागिरी, जि.रत्नागिरी मो.८५५२८९९९९
**श्री.उमाकांत देशमुख, सरचिटणीस,**रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हा तलाठी संघ,बी-१८/१०२,सिद्धिविनायक नगर,शिवाजी नगर, रत्नागिरी, जि. रत्नागिरी मो.९०४९१८४९४१

**विभाग निहाय सदस्यः**
**टी.जी.सावंत (कोकण)**
**रवी कुलकर्णी (औरंगाबाद)**
**अनिल ठोंबरे (औरंगाबाद)**
**जी.डी.महाले (नाशिक)**
**व्ही.डी. टेकाळे (अमरावती)**
**राजेश चुटे (नागपूर)**
**सी.झेड.बोरकर (नागपूर)**

(२)

मुळातच ही यंत्रणा कृषी विभागाचे एका निर्णयानुसार बसविण्यात आली होती. मात्र आजरोजी अनेक ठिकाणी **मंडळाधिकारी यांनी त्यांचे स्तरावरून नादुरुस्त पर्जन्यमापक यंत्रे दुरुस्ती करून घ्यावीत** असे आदेश निर्गमित केले आहेत. हे अनाकलनीयआहे.

राज्यात साझा/मंडळ पुनर्रचना झाली आहे. त्यानुसार कृषी विभागाने स्वयंचलीत हवामानकेंद्र उभारणीचे काम सुरु केले आहे. उलटपक्षी त्या मंडळावर म्यनुअल मोजणी केंद्र उभारणीचा प्रस्ताव नाही. ही बाब सुद्धा जिल्हाधिकारी यांचे स्तरावरून दुर्लक्षित करण्यात आली आहे. तर काही जिल्ह्यांमधून मंडळाधिकारी यांनी त्यांचे स्तरावरून उभारणे बाबत तोंडी आदेश देण्यात आले असल्याचे कळतेआहे. असे असेल तर ही बाब गंभीर आहे.

या विषयाचा संपुर्ण आढावा घेऊन मंडळाधिकारी संवर्गास अकारण वेठीस धरण्याचा हा प्रकारवेळीच थांबविण्यात यावा. अन्यथा महासंघास आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल व त्याची संपूर्ण जबाबदारी ही या प्रशासकीय यंत्रणेची राहील.

निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा, धन्यवाद......!!

**तसदीबद्दल क्षमस्व.......!!**

**आपला नम्र**



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र राज्य तलाठी पटवारी मंडळ अधिकारी समन्वय महासंघ**

प्रतिलिपी:-
१)मा.कृषी संचालक,(वि.प्र.),कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य पुणे-1
२) मा. महसूल आयुक्त, कोकण/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर, यांना माहितीस सविनय सादर.
३) मा. जिल्हाधिकारी .................. (सर्व) , आपणास नम्र विनंती की उक्त माहिती संदर्भात मंडळअधिकारी यांना सक्ती न करण्याबाबत मा. तहसीलदार यांना निर्देश देण्यात यावेत.
४) मा. अध्यक्ष/ सचिव, घटक शाखा (सर्व) आपणास विनंती की निवेदनाच्या प्रती,जिल्हा शाखांचे माध्यमातून मा. आयुक्त , मा. जिल्हाधिकारी व मा. तहसीलदार यांना सादर करण्यात याव्यात.

वाशीम.
दि. 04/06/2020

**आपला नम्र**



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र राज्य तलाठी पटवारी मंडळ अधिकारी समन्वय महासंघ**